The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत नामदेवांचे भक्ती कार्य

**प्रा.सारिका शिवाजीराव पासंगे**
संशोधक विद्यार्थिनी श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी.

**प्रस्तावना:**

भारतामध्ये पूर्वीपासून अनेक भक्ती पंथ चालत आलेले आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील वारकरी पंथ हा एक महत्त्वाचा आणि वैशिष्ट्यपूर्ण असा मध्ययुगीन भक्ती पंथ आहेवारकरी पंथ त्याच्या अनन्यसाधारणपणामुळे व वेगळेपणामुळे भारताच्या सर्व भक्ती पंथांमध्ये विशेष उठून दिसतो. पंढरपूरचा भक्ती संप्रदाय ज्ञानेश्वर व नामदेवांच्या अगोदरच प्रचारात होता. पंढरपूर क्षेत्र व पांडुरंग दैवत अति प्राचीन असल्याचे पुरावे शिलालेखातून मिळतात. महाराष्ट्रातील विठ्ठल उपासनेचा प्रवर्तक भक्त पुंडलिक आहे. संत ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या घराण्यात पंढरीच्या वारीचा प्रघात पुरापार चालू होता. या पूर्वपार चालत आलेल्या पंढरीच्या भक्ती संप्रदायाला विशिष्ट वळण लावून व तात्विक अधिष्ठान देऊन सामाजिक दृष्ट्या कार्यक्षम बनविण्याच्या श्रेयस संत ज्ञानेश्वरांकडे जाते सगुण भक्तीला अद्वैत तत्वज्ञानाचे अधिष्ठान देऊन त्यांनी डोळस बनविले.

**संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांचे धर्म सुधारण्याचे आंदोलन:**

धर्म सुधारण्याचे प्रचंड आंदोलन वारकरी पंथाच्या रूपाने महाराष्ट्रात सुरू झाले या आंदोलनाचा पाया ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रात घातला असे म्हणता येईल व या भागवत संप्रदायाचे मार्मिक वर्णन संत बहिणाबाई यांनी केलेले आहे ते पुढील प्रमाणे:

**"संत कृपा झाली|इमारत फळा आली ज्ञानदेवे रचिला पाया|उभारिले देवालया नामा तयाचा किंकर| तेने रचिले ते आवर जनार्दन एकनाथ |थांब दिधला भागवत तुका झालासे कळस| भजन करा सावकाश बहिणीमध्ये फडकती ध्वजा|निरूपण केले ओजा||"**

म्हणूनच भागवत धर्माला जे काही विशिष्ट वळण लागले त्याला ज्ञानेश्वरांच्या कर्तृत्वाप्रमाणे संत नामदेवाचे कर्तत्व कारणीभूत आहे. वैदिक पंथातील उच्च वर्णीयांकडून उपेक्षेला गेलेल्या स्त्री व क्षुद्रांच्या नैसर्गिक धर्म भावनेला तत्व विचारांची बैठक देऊन व संसारी लोकांपुढे शुद्ध आचरणाची उदात्त आदर्श ठेवून वारकरी पंथाच्या प्रचारकांनी भागवत धर्माच्या मंदिरात महाराष्ट्रीय संस्कृतीची प्राणप्रतिष्ठा केली या कार्यामध्ये संत निवृत्तीनाथांबरोबरच संत ज्ञानेश्वर संत नामदेव व त्यांच्या संतमेळ्याचा मोठा सहभाग आहे. लोकांच्या भोळ्या भाबड्या सगुण भक्तीला डोळस करण्यासाठी ज्ञानेश्वरांनी अद्वैत तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान या पंथाला मिळवून दिले त्या पायावरच भागवत धर्माचे मंदिर उभारलेले आहे त्यामध्ये संत नामदेवांनी सर्वांना समजणारे नामस्मरणाचे महत्त्व पटवून दिले. संत ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेवर भाष्य करून समतेचा संदेश दिला तो केवळ ज्ञानेश्वरीतच न राहता

प्रत्यक्ष संत मेळाव्याच्या रूपाने दिसून आला ज्ञानदेव व नामदेवांच्या सोबतच अनेक संत निर्माण झाले. हे सर्व संत वेगवेगळ्या जातीतून धर्मातून व त्यांचे सर्वांचे व्यवसाय भिन्नभिन्न होते पण त्यांना विठ्ठलाची ओढ होती संत ज्ञानेश्वर व नामदेवांचा सहवास तीर्थयात्रेच्या निमित्याने त्या संतांना लाभलेला होता. पंढरपूरच्या पांडुरंगाच्या प्रेम भावनेने व भक्तीने हे सर्व संत एकत्र बांधले गेले होते त्यामुळे एक समाजामध्ये अध्यात्मिक समानता प्रस्थापित झालेली होती. या संतमेळ्यामध्ये कुंभार असलेले गोरोबा सोनार असलेले नरहरी माळी असलेले सावता माळी न्हावी असलेले सेना व असे अनेक पंथातील संत यामध्ये सहभागी झाले. त्याचबरोबर संत चोखामेळा संत मुक्ताबाई संत जनाबाई असे शूद्र व स्त्रिया यांचाही सहभाग या पंथामध्ये होता त्यामुळे अध्यात्मिक समानता व स्त्री पुरुष समानता हे देखील विशेष या पंथाचे आहे. या पंथाने जे धर्म सुधारण्याचे आंदोलन सुरू केले होते त्यामध्ये सर्व संतांना एकमेकांविषयी आदरभाव होता सर्वजण एकमेकांना सारख्याच दर्जाची समानतेची वागणूक देत होते आणि यामध्ये पंढरीचा विठ्ठल हा लेकुरवाळा माऊली बनलेला होता.

**संत नामदेवाचे जन्मस्थान व जन्मकाल:**

संत नामदेवांचा जन्म शके ११९२(इ.स १२७०) मध्ये कार्तिक शुद्ध एकादशीला रविवारी दिनांक २६ ऑक्टोबर रोजी झाला.संत नामदेवांचा कालखंड इसवी सन १२७० ते १३५०असाच ठरविला आहे. संत नामदेवांच्या जन्मस्थाना विषयी अनेक मतमतांतरे आहेत. ही प्रख्यात संत चरित्रकार महिपती व अनंत दास यांना यांनी आपल्या ग्रंथात नामदेवांचे जन्मस्थान पंढरपूर दिले आहे हे इनामदार यांनी आपल्या ग्रंथात नमूद केले. संत नामदेवांनी आपल्या आत्मचरित्रपर अभंगात नरसी ब्राह्मणीचा दामाशेठ शिंपी असा उल्लेख केला आहे. यावरून नामदेवांचा जन्म पंढरपूर ऐवजी नरसी बामणी येथे झाला असे दिसून येते मात्र जोड नावाने उल्लेख केलेली ही दोन गावे महाराष्ट्रातील कोणत्या भागात असावी याबाबत संशोधकांची व चरित्रकारांची मत भिन्नता दिसून येते. नरसी बामनी हे सातारा जिल्ह्यातील कराड जवळचे बहे नरसिंगपूर असे इसवी सन १९२६पर्यंत मानले जात होते. मात्र भारत इतिहास संशोधक मंडळाच्या १९२६ च्या पत्रिकेत एक लेख लिहून नरसी बामणी हे गाव मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात असावे असे श्री केशवराव कोरटकर यांनी पुराव्यानिशी मांडले. त्यांच्या मते परभणी जिल्ह्यात नरसी व बामणी अशी दोन गावे कोसांच्या अंतरावर जवळ आहेत. नामदेवांचे आजोळ कल्याणी हे बामणी पासून अवघ्या तीन कोसांवर आहे.नरसी गावाबाहेर श्री केशव देवाचे एक देवालय आहे. नामदेवांच्या हातून देव दूध प्यायला या आख्यायिकेतील मूर्ती या केशव राजाचीच होय. शिवाय नरसी येथे नामदेवांचे एक वृंदावन आहे कयाधु तीरी नामदेवांची समाधी असून तेथे दरवर्षी यात्रा भरते. ज्या मंदिरात नामदेवांना गुरु उपदेश झाला तो औंढा नागनाथ मराठवाड्यातच आहे. यावरून संत नामदेवांचे जन्मस्थळ परभणी जिल्ह्यातील नरसी बामणी हेच आहे हे सिद्ध होते.

**संत नामदेवांचे वारकरी संप्रदायातील कार्य:**

'माझ्यासारखा भक्त मीच 'या अहंकाराने पछाडलेले संत नामदेव हे निवृत्तीनाथ व संत ज्ञानदेवांचा योग्य तो मान ठेवीत नसत. ते पाहून संत मुक्ताबाई यांना राग येतो आणि त्या म्हणतात

अखंड जयाला देवाचा शेजार| का रे अहंकार नाही गेला भक्तीचा हा अहंकार झालेल्या संत नामदेवांचे मडके कच्चे आहे ते गोरोबाकाकांकडून चांगले भाजावे असे त्या ठरवतात. नंतर संत ज्ञानेश्वर त्यांना औंढे नागनाथ या मंदिरात पाठवतात तेथे खुशाल पिंडीवर पाय ठेवून निसले निजलेले विठोबा खेचर त्यांना भेटतात. त्यानंतरच त्यांना अद्वैताचे ज्ञान मिळते. मग संत विसोबा खेचर हे संत नामदेवांचे अध्यात्मिक गुरु बनतात. संत नामदेवांच्या गाथेतून त्यांच्या नावे सुमारे अडीच हजार अभंग उपलब्ध आहेत. यातील बरेच अभंग संत नामदेवांचे असतील असे म्हणता येत नाही त्यामध्ये वेगळेपणा आढळतो. तरीही बरेचसे अभंग संत नामदेवांचेच असावेत. नामदेव गाथेमध्ये बाल क्रीडा, श्रीकृष्ण लीला,श्रीराम महात्म्य, विठ्ठल महात्म्य, पंढरी महात्म्य ,संत ज्ञानेश्वरांच्या भावंडांची चरित्रे, नामदेवांचे आत्मचरित्र,उपदेश पर रचना व हिंदी भाषेतील काही पदे, प्रल्हाद, हरिश्चंद्र यांची पौराणिक चरित्रे यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे संत कबीर ,संत मीराबाई ,संत सावता माळी ,संत चोखामेळा या संतांची चरित्रही नामदेव गाथेमध्ये आढळतात. हरी किर्तन आणि नामसंकीर्तनाची प्रथा संत नामदेवांनी सुरू ठेवली. संत ज्ञानेश्वर व त्यांची भावंडे समाधीस्थ झाल्यानंतर सर्वत्र अंधार पसरला होता. यादवांचे राज्यही गेले होते. धर्म संकट आलेले होते. अशा बिकट काळात संत नामदेवांनी भागवत धर्माचे पताका खांद्यावर घेऊन पंजाब पर्यंत हरिनामाचा गजर पोहोचविला. विठ्ठलाची कीर्ती पंजाब मध्ये गेली म्हणून संत नामदेव हे वारकरी पंथातील आद्य प्रचारक म्हणून ओळखले जातात. अशाप्रकारे भजन कीर्तन, उत्तरेकडील प्रवास व कवित्वाची हिंदी मराठीतील गुंफण या मार्गाने पंढरीच्या विठ्ठल संप्रदायाचा सर्वदूर प्रसार व प्रचार करण्यात नामदेवांनी आपले संपूर्ण आयुष्य सार्थकी लावले शेवटची २० एक वर्ष संत नामदेवांनी पंजाबात काढले असली तरी अखेरीला पांडुरंगाच्या द्वारे पंढरीला आपला देह विसर्जित व्हावा या इच्छेने ते पंढरीला आलेले असावेत .आख्यायिकेप्रमाणे वयाच्या ८० व्या वर्षी इसवी सन १३५० मध्ये ( शके १२७२) आषाढ वद्य त्रयोदशी रोजी पंढरपूरला नामदेवांनी आपला देह ठेवला. विठ्ठलाच्या महाद्वारी 'नामदेवांची पायरी' दाखवली जाते .तीच नामदेवाची समाधी होय.

**भक्त शिरोमणी संत नामदेव यांचे साहित्य:**

भक्त शिरोमणी म्हणून प्रसिद्ध असलेले संत नामदेव त्यांच्या रसाळ आणि मधुर वाणीबद्दल विशेष प्रसिद्ध आहेत. मनाची व्याकुळता, विठ्ठलाची ओढ,कीर्तनाची आवड, नामस्मरणाचे महत्त्व असे कितीतरी विशेष संत नामदेवांचे अभंग वाणी दिसून येतात. संत नामदेवांनी आत्मचरित्रपर अभंग ,संत ज्ञानेश्वरांचे चरित्र, संत महात्म्यांचे चरित्र आत्मपर अभंग ,आख्यान रचना बाळक्रीडेचे अभंग अशा अनेक विविध रचना संत नामदेवांच्या नावे आहेत. त्यामधील काही पुढील प्रमाणे:

**आत्मचरित्रपर अभंग:**

संत नामदेवांची अभंगवाणी म्हणजे आत्मपरीता व जिव्हाळा होय त्यांच्या कविता म्हणजे भावकविताच असतात.पारमार्थिक जीवनाच्या संघर्षात संत नामदेवांचे चरित्र त्यांच्या काही अभंगातून दिसते. संत नामदेवांच्या विठ्ठल भक्तीला त्यांचे आई-वडील पत्नी यांनी केलेल्या विरोध संत ज्ञानेश्वरादी भावंडासमोर प्रकट झालेला अहंकार, शतकोटी अभंगारचनेची केलेली प्रतिज्ञा असे काही आत्मचरित्रात्मक अभंग दिसतात.

**" शिंपीयाच्या कुळी जन्म मज जाला| परी हेतू गुंतला सदा शिवी असा आत्मविश्कारचा उत्कृष्ट नमुना या अभंगाच्या माध्यमातून दिसतो. "लावोनी लंगोटी जालेती गोसावी| आमुची उठाठेवी कोण करी| अशी म्हणणारी राजाई कुशलतेने साकारली आहे. विठ्ठल भेटीचा आनंद संत नामदेवांनी चित्रित केला आहे तो पहा "**

**तू अवकाश मी भूमिका| तू लिंग मी साळुंका| तू समुद्र मी द्वारका| स्वये दोन्ही||**

विठ्ठलाच्या चरणी शरणागती व विठ्ठलाचे दर्शन झाल्यावर होणारा परमानंद त्यांच्या अभंगातून व्यक्त होतो.

**संत ज्ञानेश्वरांचे चरित्रात्मक अभंग:**

संत नामदेवांनी आदि ,समाधी आणि तीर्थावळी या तीन प्रकरणातून ३५० अभंगांच्या माध्यमातून चरित्र साकारले आहे. तीर्थावळी व समाधी ही दोन प्रकरणे नामदेवांनी अगोदर लिहिली व संत ज्ञानेश्वरांच्या चरित्राला पूर्णता यावी म्हणून आदी हे प्रकरण नंतर लिहून पूर्वीच्या दोन प्रकरणांना जोडले. ज्ञानेश्वरांविषयी वाटणार आदर आणि प्रेमभाव या अभंगाच्या माध्यमातून व्यक्त होतो. या तीन भावंडांचे वर्णन करताना ते म्हणतात,

**"तिन्ही देव जैसे परब्रहमी चे ठसे | जगी सूर्य जैसे प्रकाशले "**

तीर्थावळी या प्रकरणात ज्ञानेश्वरांसोबत केलेल्या तीर्थाटनाचे वर्णन यामध्ये आलेले आहे.समाधी हे प्रकर करूण रसाचा उत्कर्ष होय. ज्ञानेश्वर समाधिस्त झाल्यावर त्यांची जी मनोवस्था झाली ती संत नामदेवांनी अभंगाच्या माध्यमातून सांगितली. त्यांच्याविषयीचा जिव्हाळा आत्मीयता या चरित्रात्मक अभंगातून दिसतो. ते म्हणतात,

**"कोण जाणे माझे जीवीचा कळवळा | प्रेमाश्रू डोळा लोटताती नामा म्हणे येथे बोलवेना मज | जातसे निजगुज आवडीचे||**

**संत महात्म्यांची चरित्रे:**

आपल्या उत्कट भक्तीने ईश्वरास प्रिय झालेल्या अनेक संतांची नामदेवांनी मुक्तकंठाने स्तुती केली. संत गोरा कुंभार, संत जनाबाई, संत चोखामेळा यांची संत नामदेवांनी रेखाटलेली चरित्रे आहेत ही संपूर्ण चरित्र नसली तरी त्यांच्या जीवनातील एखादा दुसरा प्रसंग नामदेवांनी या चरित्राच्या माध्यमातून वर्णन केला आहे. संत जनाबाई संदर्भात ते म्हणतात नामयाचे घरी असे दासी जनी |तिने चक्रपाणी वश केला|| तसेच गोरोबा कुंभार यांच्या संदर्भात ते म्हणतात,

**प्रेमा अंगी सदा वाचे भगवंत |प्रेमळ तो भक्त कुंभार गोरा||**

संत नामदेवांची उपदेश पर अभंग अभंग आहेत बाळ किडीचे अभंग बाल सुलभवृत्तीचे दर्शना घडवितात श्रीकृष्णाच्या जीवनातील नाट्यपूर्ण व अद्भुतरम्य प्रसंग संत नामदेवांनी रेखाटले आहेत राधे विलास वर्णने, श्रीकृष्ण मथुरेला गेल्यानंतर विरह झालेल्या गोपी त्या संदर्भातील काही विरहण्या प्रसिद्ध

आहेत. संसार परजनी |दूर दिधले मज साजणी| द्वारकापुर पाटणी| माझे माहियेर. आरत्या, भुपाळ्या, गौळणीही संत नामदेवांनी लिहिलेल्या आहेत.

**' युगे अठ्ठावीस विटेवरी उभा| वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा'**

ही नामदेवांची आरती प्रसिद्ध आहे.

**संत नामदेवांचे पंजाब मधील अलौकिक कार्य:**

' गुरुग्रंथसाहीब 'या शीख धर्मीयांच्या धर्मग्रंथात ६१ पदे समाविष्ट आहेत.त्याचबरोबर काही हिंदी अभंग रचनाही त्यांनी केलेल्या आहेत. नामदेव हे बहु भाषिक होते लोक भाषेत परमार्थ सांगण्याची त्यांची पद्धत होती उत्तरेकडे श्रीराम व श्रीकृष्ण या देवतांचे प्राबल्य असल्याचे लक्षात घेऊन विठ्ठलवाडी नामदेवांनी विठ्ठल नामासोबत रामनामाचा व कृष्ण नामाचा गजर केला. आपल्या आयुष्याच्या उत्तरकाळात पंजाबातील गुरुदासपूर जिल्ह्यात दीर्घकाळ वास्तव्य केले संत नामदेवांनी पंजाबात केलेले भक्ती कार्य इतके प्रबळ ठरले की घुमान येथे ज्या निर्जन वस्ती ते वास्तव्य करत होते तेथे व आसपासच्या प्रदेशात लोकांची वस्ती होऊन तेथे गावेच बसवली गेली . संत नामदेवांचे कार्य वारकरी पंथाच्या सर्वसमावेशकतेच्या तत्त्वज्ञानावर व भेदभाव दूर ठेवण्याच्या आचरणावर उभे असल्याने पंजाब मध्येही लोकां लोकांमधील भेदभावाचे बंध कोसळून पाडण्याचे कार्य संत नामदेवांनी केले.

**समारोप:**

अशाप्रकारे संत नामदेवांचे एक भावकवी म्हणून मराठी साहित्यामध्ये महत्त्व आहे. संत नामदेवांचे व्यक्तिमत्व भावोत्कट आहे.निरागसता, विशालता हे त्यांचे व्यक्तिमत्त्वाची स्थायीभाव होते. संत नामदेवांच्या अभंगवाणीतून सहजता, स्वाभाविकता, निरागसता, समर्पणशीलता, वासल्य हे विशेष जाणवतात.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

१)पंजाब मधील नामदेव, शं.पू. जोशी १९४०

२) ज्ञानदेव आणि नामदेव, शं.दा. पेंडसे १९६९

३) पाच संतकवी, शं.गो. तुळपुळे

४) श्री नामदेव (चरित्र, काव्य आणि कार्य), महाराष्ट्र शासन १९७०

५) संत नामदेव और हिंदी पर साहित्य, रामचंद्र मिश्र, १९६९

६)श्री नामदेव गाथा, महाराष्ट्र शासन ,१९७०